RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published on : 12 November, 2016 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 November, 2016

# अजायब ✲ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : पाचवा | नोव्हेंबर २०१६



वैरी मन (सत्संग) 5

ध्यान-अभ्यासा विषयी प्रश्नोत्तरे (प्रश्नोत्तरे) 29

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.



# वैरी मन

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू नानकदेवजी महाराजांची वाणी
मुंबई – ९ जानेवारी, १९९४

परमात्म्याने सर्व योनींमध्ये मनुष्यजन्मास सर्वश्रेष्ठ दर्जा दिलेला आहे. सर्व ऋषी–मुनींनी व परमेश्वराच्या प्रिय संत–महात्म्यांनी मनुष्यजन्मास या पृथ्वीतलावरील सर्वोत्तम जीव असे वर्णन करीत आपणांस असेदेखील सांगितले आहे की ज्या परमात्म्याचा शोध आपण घेत आहोत, त्याचा अंश आपल्या शरीरात वास करीत आहे. तो परमात्मा कोठेही इतरत्र बाह्य जगात नसून, तो आपल्या शरीरामध्ये आहे.

आपले दुर्दैव आहे की इतकी वर्षे या शरीररूपी मंदिरामध्ये राहूनही या मंदिरामध्ये जाऊन आपण परमात्म्याचा शोध घेतला नाही. परमात्मारूपी कलाकार कोणाच्याही मदतीशिवाय आईच्या उदरामध्ये आपले कसब दाखवित असतो, या शरीराची रचना घडवित असतो की कुठे नाक लावावे, कुठे मुख लावावे, कुठे डोळे लावावेत, कुठे श्वास नलिका लावावी आणि कशाप्रकारे मातेच्या उदरात देखील यास अन्न पोहोचवावे.

हा कलाकार आपल्या शरीरामध्येच असूनही आपण अंतरात जाऊन त्याची कारागिरी कधी पाहिली नाही. जर एखाद्या डॉक्टरने विचार केला की मातेच्या शरीरावर शस्त्रक्रिया करून मी या कलाकारास बाहेर काढेन किंवा त्यास बघेन तर तसे करणेही अशक्य आहे. या सर्व सूक्ष्म गोष्टी आहेत ज्यांस त्या कलाकाराने आपल्या शरीरात अशाप्रकारे लपवून ठेवलेल्या आहेत जसे इंजिनिअर टेलिव्हिजनमध्ये निरनिराळे सूक्ष्म भाग अचूक जोडून ठेवतात.

टेलिव्हिजनमध्ये निरनिराळी वाद्ये वाजतात, त्यामधून स्त्री–पुरुष गात असलेले आवाज ऐकू येतात. परंतु आपण जर विचार केला की त्यामधून एखादी स्त्री वा पुरुष बाहेर काढून त्यांच्याकडून आपले घरकाम करून घ्यावे

आणि त्यासाठी तुम्ही तो टेलिव्हिजन जरी तोडलात तरी ते शक्य होणार नाही. खरेतर आतमध्ये सर्वकाही असते.

ऋषी-मुनींनी, संत-महात्म्यांनी या शरीररूपी मौल्यवान हिऱ्याच्या अंतर्यात शोध घेतला आणि त्यांना तेथेच परमात्मा आढळला. या जगातून स्वगृही परतताना ते आपणांस हाच संदेश देऊन गेले व धर्मग्रंथांमध्ये देखील लिहून गेले की तुमच्या अंत:करणामध्ये खरोखरीच परमात्म्यास प्राप्त करण्याची इच्छा-ओढ-तळमळ असेल तर तुम्ही अंतर्यातच त्याचा शोध घ्या, कारण परमात्मा बाह्यजगात मिळणार नाही, तो अंतर्यातच प्राप्त होईल.

अंतर्यात खूप शोध घेतल्यानंतर महात्म्यांनी ग्रंथ-पोथ्यांमध्ये नमुद केले आहे की, तो परमात्मारूपी महान कलाकार तुमच्या शरीरामध्येच आहे. ज्या महात्म्यांची भेट परमात्म्याशी झाली, त्या महात्म्यांनी ती भेट होत असताना, जी काही आंतरिक दृश्ये पाहिली व त्यांना ज्या काही अडचणी आल्या, त्या सर्वांचे वर्णन त्यांनी धर्मग्रंथांमध्ये नमुद केले जेणेकरून त्यापासून आपणांस फायदा व्हावा, मार्गदर्शन मिळावे. तसेच ज्यांच्या मदतीने त्यांनी आंतरिक डोंगर-दऱ्या पार केल्या त्या महात्म्यांचा उल्लेख त्यांनी धर्मग्रंथांमध्ये केला.

तुम्ही जर त्या डोंगर-दऱ्या पार करू इच्छित असाल, परमात्म्यास भेटू इच्छित असाल, तर तुम्ही अशा एका महात्म्यांना भेटा ज्यांनी जीवनामध्ये परमात्म्याचा शोध घेऊन, त्याची भेट घेतली आहे. ते महात्मा तुमची सुरत शब्दाशी जोडू शकतात आणि तुम्हांस मार्गदर्शन करू शकतात की कशा तऱ्हेने तो महान कलाकार तुमच्या अंतर्यात वसत आहे.

आपल्या नेत्रांच्या खालील पातळीवर परमात्मा आपणांस भेटू शकत नाही, कारण ती पातळी विषय-विकारांनी बरबटलेली आहे. परमात्मा तिसऱ्या तिळाच्या वरील पातळीवर पोहोचल्यानंतरच भेटू शकतो. तुमच्या समोर गुरू नानकदेवजींची वाणी सादर केली जात आहे, तुम्ही नीट लक्षपूर्वक ऐका :

**आपे करता पुरख बिधाता ।। जिन आपे आप उपाय पछाता ।।**
**आपे सतगुर आपे सेवक आपे सृस्ट उपाई हे ।।**

जे ऋषी–मुनी परमात्म्याच्या शोधात तल्लीन होतात, ज्यांची सुरत शब्दाशी जोडली जाते, त्यांना सृष्टीच्या कणा–कणात परमात्मा दिसतो. त्यांना जाणीव असते की जे काही घडत आहे ते परमात्म्याच्या आदेशानुसारच घडत आहे.

सर्व जीवांमध्ये परमात्म्याचे अस्तित्व आहे असे म्हणणे अतिशय सोपे आहे, परंतु आपण स्वत:चे आत्मनिरीक्षण करून पहावे की आपण खरोखरच त्यानुसार वागतो का? हा आत्मनिरीक्षणाचा विषय आहे.

एक समाज दुसऱ्या समाजास तसेच एक जात वा धर्म दुसऱ्या जातीस वा धर्मास कमी लेखत आहे. प्रत्येक मनुष्य असाच विचार करीत आहे की माझेच वागणे बरोबर असून इतर सर्वजण चुकीचे वागत आहेत. असे असूनही आपण दावा करतो की आम्ही परमात्म्याची भक्ती करतो, त्यास भेटू इच्छितो. खरेतर ज्यांचे परमात्म्यावर प्रेम असते, त्यांचे सकल विश्वावर प्रेम असते. मी तर असेही म्हणेन की, त्यांचे सर्व पशू–पक्ष्यांवरदेखील प्रेम असते. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात :

***मंदा जाने आपको अवर भला संसार ।***

असे महात्मा या जगामध्ये एक आदर्श उदाहरण बनून जन्मास येतात. ते कधीही स्वत: इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत असे दर्शवित नाहीत. ते सोबत प्रेम घेऊन जगात येतात व आपणा सर्वांमध्ये प्रेमाची निर्मिती करतात. ते सांगतात की ते स्वत: सतगुरूरूपी परमात्म्याच्या कृपेनेच पावन झालेले आहेत.

ज्या परमात्म्याने या शरीराची निर्मिती केलेली आहे, आपणांस जन्माला घातलेले आहे, तो परमात्माच या शरीरामध्ये वसत आहे. तोच सर्वांची निर्मिती करतो आणि तोच सर्वांना नष्ट करतो. तो स्वत: सेवक बनून ध्यान–अभ्यास करतो व स्वत:च गुरू बनून मार्गदर्शन करण्यासाठी येतो.



आपणा जीवांचा उद्धार जेव्हा परमात्मा करू इच्छितो तेव्हा तो स्वत:ची शक्ती एखाद्या मनुष्याच्या अंतरात ठेवतो. कारण जर तो देव–देवता बनून आला असता, तर आपण त्यास पाहू शकलो नसतो, त्यामुळे त्यापासून फायदाही करून घेऊ शकलो नसतो. महाराजजी सांगत असत की आपण आपल्या सारख्यांवरच प्रेम करू शकतो. परमात्मा जर गाई–म्हशीचा देह धारण करून आला असता, तर आपण त्याची भाषा समजू शकलो नसतो. मनुष्यच मनुष्याचा शिक्षक बनू शकतो. म्हणून तो मनुष्यांमध्ये मनुष्य बनून येतो परंतु तरी त्याची आंतरिक पातळी मनुष्यापेक्षा उच्च असते.

महाराज कृपाल सांगत असत,''तुरुंगामध्ये कैदी असतात तसेच डॉक्टरही असतात. परंतु कैदी तेथे त्यांची सजा भोगत असतात, तर डॉक्टर कैद्यांवर उपचार करण्यासाठी येतात. त्यामुळे तेथे डॉक्टर स्वतंत्र असतात.''

त्याचप्रमाणे संत–महात्मा आपल्यासारखे तना–मनाचे कैदी नसतात. ते स्वतंत्र पुरुष असतात. परमात्म्याने त्यांना आदेश दिलेला असतो की तू अमूक–अमूक आत्म्यांना परमार्थाबद्दल समजावून परत आण, त्यांना नामाशी एकरूप कर. त्यामुळे परमात्म्याने दिलेल्या आदेशानुसार ठराविक काळापुरते ते येथे तनात वास्तव्य करीत असतात. कबीर साहेब सांगतात :

***तरवर सरवर सन्त जन चौथे बरसे मेह ।***
***पर स्वार्थ के कारणे चारो धारे देह ।।***

झाडे इतरांच्या फायद्यासाठी फळांची निर्मिती करतात. नद्या सकल जगाच्या हितासाठी वाहत असतात आणि पर्जन्यवृष्टी देखील सर्व जगाच्या फायद्यासाठीच होते. याचप्रमाणे संत–महात्म्यांचा या जगामध्ये येण्याचा स्वत:चा असा काहीच उद्देश नसतो. ना ते नवीन धर्माची स्थापना करण्यासाठी येतात, ना अगोदर अस्तित्वात असलेला एखादा धर्म नष्ट करण्यासाठी येतात. त्यांच्या अंत:करणात अशी बिलकुल इच्छा नसते की आपले भरपूर सेवक असावेत. त्यांना काही सैनिकांची फौज तयार करायची नसते. ज्या प्रेमींच्या अंतरामध्ये परमात्म्याच्या मिलनाची ओढ असते, अशा प्रेमींसाठीच ते या जगात येतात. अशा प्रेमींकडे ते आवर्जुन जातात आणि त्यांना स्वगृही जाण्याची माहिती देतात. गुरू अर्जुनदेवजी सांगतात :

***जिन तुम भेजे तिने बुलाए सुख सहज सेती घर आओ ।***

ज्या परमात्म्याने तुम्हाला या जगात पाठविले आहे, तो परमात्मा आमच्याद्वारे तुम्हांस माघारी स्वगृही बोलावत आहे. त्यासाठी ना तुम्हांस तुमची बोली भाषा बदलण्याची गरज आहे, ना तुमची जात वा धर्म सोडण्याची गरज आहे. तुम्ही कोणत्याही प्रकारचे वा रंगाचे वेष परिधान करा, त्याचा सुरत–शब्दाच्या अभ्यासावर कोणताही परिणाम होत नाही. खोट आपल्या मनामध्ये आहे. म्हणूनच **मन** आपला **वैरी** आहे. आपल्या आणि परमात्म्यामध्ये अडसर मनाचा आहे. त्यामुळे हा अडसर दूर केल्यास सर्वजण आपणांस मित्र

आणि बांधवाप्रमाणे वाटतात, सकल विश्व आपल्या घराप्रमाणे जाणवू लागते. त्यानंतर आपण असे म्हणू शकत नाही की अमुक जात वाईट आहे आणि अमुक जात चांगली आहे.

जोपर्यंत आपण जाती-धर्मांमध्ये अडकलेलो आहोत, तोपर्यंत आपण परमात्म्यापासून दूर आहोत. परमात्म्याने कोणावरही लेबल लावून पाठविलेले नाही की तू हिंदू आहेस, तू शिख आहेस वा तू ईसाई आहेस. तसेच परमात्म्याने असे कधीच सांगितले नाही की त्यास फक्त हिंदू भेटू शकतात, मुस्लीमांना नाकारले जाईल वा शिख भेटू शकतात आणि ईसाईंना हाकलले जाईल.

महात्मा आपणांस सांगतात की तेथे कोणी जात-पात विचारीत नाही. येथील कुणाची जात-पात अग्नीमध्ये जळून जाणार आहे, तर कुणाची मातीमध्ये गाडली जाणार आहे. गुरू साहेब सांगतात :

***जात पात पूछे न कोए, हरि को भजे सो हरि का होए ।***

येथे कोणीही जात-पात विचारत नाही. जो कोणी परमात्म्याचा जप करतो, त्यास स्वत:च्या अंतर्यात प्रगट करून घेतो, तोच परमात्म्यास प्रिय असतो. ज्याप्रमाणे आईला तिची मुले प्रिय असतात, त्याप्रमाणे परमात्म्यास त्याचे भक्त प्रिय असतात. येथील समाज आपणच स्वत: तयार केले असून, त्यांच्या नादी लागून आपण परमात्म्यापासून दुरावलो गेलो आहोत आणि एकमेकांस दुषणे देत आहोत.

तुम्ही विचार करून पहा! जर येथे एखाद्या धर्मस्थानाची थोडी-फार तोड-फोड झाली वा चुकून भिंतीस भेग पडली तर आपण परमात्म्याने तयार केलेली (मनुष्यरूपी) हजारो मंदिरे पाडण्यास सुरूवात करतो, मनुष्यहानी करण्यास सुरूवात करतो व स्वत:स धर्म-रक्षक म्हणवून घेतो, अशा हानी करणाऱ्या मृत-व्यक्तीस हुतात्मा म्हणतो. परंतु हत्या केल्याने जर कुणी हुतात्मा बनत असेल, तर त्याहून स्वस्त सौदा कोणता असू शकेल?

सन १९४७ मध्ये मी स्वत:च्या डोळ्यांनी घटना पाहिल्या आहेत, इतर अनेकांनी देखील अशा घटना पाहिल्या आहेत. त्यावेळी खूप मोठ्या प्रमाणात मनुष्य हत्या झाली. तसे केल्याने जर हुतात्मा झाले असते तर सर्व जगच हुतात्मा बनले असते. ही आपली विचारधारणा चुकीची आहे. जो परमात्म्याची भक्ती करतो, त्याचे सकल विश्वावर प्रेम असते.

आपण गुरू नानकदेवजींची वाणी वाचतो. त्यांचे हिंदू तसेच मुस्लीमदेखील शिष्य होते. गुरू नानकदेवजी मक्केस गेले नव्हते का? त्यांनी मक्केस वाईट संबोधिले होते का? गुरू गोविंद सिंहजींनी देखील हाच संदेश दिला की तुम्ही परमात्म्यास भेटू इच्छित असाल तर स्वत:च्या अंतरात इतरांप्रती प्रेम निर्माण करा. मी तुम्हांस सत्य सांगतो :

***जिन प्रेम कियो तिन ही प्रभ पायो ।***

आजपर्यंत ज्याने कोणी परमात्म्यास प्राप्त करून घेतले आहे, ते फक्त प्रेमाद्वारेच केले आहे. प्रेमापासून जेव्हा आपण दुरावतो तेव्हा निरनिराळ्या पंथांची निर्मिती करतो, एकमेकांचा जीव घेण्यास उतावळे होतो. परंतु आपला खरा **वैरी** जर कोणी असेल तर ते आपले **मन** आहे. ते आपले **वैरी मन** आपल्या अंतरातच वसलेले आहे. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात :

***मन ही नाल झगड़ा मन ही नाल साथ ।***

आपले **वैरी मन** एखाद्या वकीलाप्रमाणे आपणांस समजावत आहे. आपणांस वाममार्गावर नेत आहे. तुम्ही त्या **वैरी मनास** सांगा, त्यास समजवा की तू गुरुचरणी समरस होऊन पाहा! आपण जेव्हा सत्संगात जातो, शब्दनामाची कमाई करू लागतो तेव्हा मनात वादळ निर्माण होते. कारण मनास जाणीव होते की आता मला कैद व्हावे लागेल, माझे स्वातंत्र्य हिरावले जाईल.

महात्मा आपणांस समजावतात की परमात्मा स्वत: सतगुरू स्वरूपात येतो आणि स्वत:च सेवक बनून त्यांची भक्ती करतो. अशी आपली अवस्था

तेव्हाच होते, जेव्हा आपण मन–मायेच्या कचाट्यातून सुटून वरती जातो. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात :

*मंदा किसनू आखिए शब्द देखो लिव लाए ।*
*बुरा भला तिच्चर आखदा जिच्चर है दो माहे ।।*

आपण तोपर्यंतच एखाद्यास नावे ठेवतो, जोपर्यंत आपण परमात्म्यापासून दूरावलेले असतो. परंतु जेव्हा आपले परमात्म्याशी मिलन होते, तेव्हा आपल्या लक्षात येते की सर्वांमध्ये आत्मा असून परमात्मा देखील सर्वांच्या अंतर्यातच आहे. संत–महात्म्यांचे लक्ष एखाद्या समाजावर नसून ते आत्म्यावर असते. आत्मा निर्दोष असतो आणि खोट मनामध्ये असते. संत–महात्मे सर्वांवर आत्मा समजून प्रेम करतात.

**आपे नेड़ै नाहीं दूरे ।। बूझेंह् गुरमुख से जन पूरे ।।**
**तिन की संगत अहनिस लाहा गुर संगत एह वडाई हे ।।**

आपण प्रेमाने सांगत आहात की ज्यांच्यावर परमात्मा कृपा करतो, त्यांना तो स्वत:जवळ आणतो व त्यांना सांगतो की मी तुमच्या शरीरामध्ये बसलेलो आहे. ज्यांच्यावर परमात्मा कृपा करीत नाही, ते लोक कर्मकांडांमध्ये गुंतून पडतात, बहीर्मुखी बनतात. कर्मकांडांविषयी गुरू नानकदेवजी सांगतात :

*पिर परदेस श्रृंगार बनाए, मनमुख अंध ऐसे कर्म कमाए ।*
*हलत न शोभा पलत न ढ़ोई, ऐहला जन्म गँवावणेया ।।*

आपल्या हिंदुस्थानातील एखाद्या स्त्रीचा पती जर अमेरिका वा इंग्लंडला गेला असेल व तो नसतानाही ती स्त्री साज–श्रृंगार करीत असेल तर समाज तिच्यावर टिका करतो की तिचे चारित्र्य ठिक नाही. कारण तिचा पती परदेशी असताना ती कुणास दाखविण्यासाठी साज–श्रृंगार करीत आहे? त्याचप्रमाणे ज्याच्याजवळ परमात्मा नाही, त्याचे कर्मदेखील त्या स्त्रीप्रमाणेच आहे. कर्मकांडे परमात्म्यास प्राप्त करण्याचा मार्ग नाही.

आपण मनमुख, मुर्ख व अडाणी आहोत. आपण त्या स्त्रीप्रमाणे साज–श्रृंगार करीत आहोत जे परमात्म्यास स्वीकारार्ह नसते. अशा व्यक्तीस ना जगात मान प्राप्त होतो ना परमात्मा त्यास जवळ करतो. आपण जो काही वेळ कर्मकांडांमध्ये व्यतीत करतो तो व्यर्थ आहे. स्वामीजी महाराज सांगतात :

***पानी मथे हाथ कुछ नाहीं, खीर मथन आलस भरा ।***

कर्मकांडे करणे म्हणजे फळाच्या गाभ्यास महत्त्व न देता त्याच्या सालाची काळजी घेणे होय. आपण बाहेर कर्मकांड करणे म्हणजे पाण्यामध्ये रवी घुसळण्याप्रमाणे असते. तसे केल्याने लोणी न निघता निव्वळ फेसच निघेल. लोणी फक्त दुधापासूनच बनलेले दही घुसळल्यानेच प्राप्त होते. सुरत–शब्दाच्या अभ्यासास दूध आणि नामास लोणी असे संबोधले आहे. आपण जेव्हा सुरत–नामाचा अभ्यास करतो, तेव्हा त्यापासून अस्सल लोणी प्राप्त होते आणि आपल्या अंतर्यात शब्द प्रगट होतो. कबीर साहेब सांगतात :

***बाहर क्या दिखाईए भीतर जपिए नाम ।***

बाह्यजगास काय देखावा करता? तुम्ही जे काही आहात ते परमेश्वरास दाखवा कारण तो तुमच्या अंतर्यात बसलेला आहे. भीखा साहेब सांगतात :

***भीखा भूखा को नहीं, सबकी गठरी लाल ।***
***गिरह खोल न जानी, ताँते भए कंगाल ।।***

सर्वांच्या अंतर्यात परमात्मा बसलेला आहे. परंतु आपल्या आत्म्याची आणि मनाची जी गाठ बसली आहे, ती गाठ आपण स्वत: खोलू शकत नाही. परमात्म्याने आपल्या अंतर्यात ठेवलेला अनमोल हिरा–लाल आपण प्राप्त करू शकत नाही.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ‘‘जर एखाद्या भिकाऱ्याच्या घरी जमिनीखाली करोडो रुपये गाडून ठेवलेले असतील, परंतु तो बिचारा भिक्षा मागत फिरत असल्यास, त्यास त्या धनाचा काय उपयोग? त्याच्या घरातील खजिन्याची माहिती जाणणारा जर कुणी मनुष्य त्या भिकाऱ्यास भेटला व

त्याने सांगितले अमुक ठिकाणी तू जमीन खोद. त्यानुसार त्या भिकाऱ्याने जमीन खोदून, तेथून धन प्राप्त केले तर तो छान घर बांधून सुखी जीवन जगू शकेल. आता तुम्हीच सांगा, अशावेळी तो भिकारी त्या धन–संपत्तीचे आभार मानेल की ते धन मिळवून देणाऱ्याचे? अशावेळी आपण स्वत: सांगू की संपत्ती अगोदरपासून घरामध्ये असूनही तो भिकारी उपाशी राहत असे. त्यामुळे ज्याने संपत्ती प्राप्त करून दिली, त्याचेच तो आभार मानेल.''

याचप्रमाणे युगा युगांतरापासून आपण परमात्म्यापासून दुरावलेलो आहोत. तो आपल्या अंतरामध्ये असूनही आपण कधी कुत्रा, कधी किडा, कधी वृक्ष बनतो आणि हीन योनीमध्ये फिरत राहतो. आपण कशाप्रकारे विषय–विकारांनी त्रस्त झालेलो आहोत. आपणांस जेव्हा महात्मा भेटतात, तेव्हा ते आपणांस सांगतात,''या बंधुंनों! तुमची परमात्म्याशी गाठ घालून देतो.'' म्हणूनच आपण आपल्या सतगुरूंचे उपकार मानतो, आपण स्वत:स त्यांना समर्पित करतो. कारण युगा–युगांतरापासून दुरावलेल्या परमात्म्याशी ते आपली गाठ घालून देतात.

संत–महात्मे एखादी जडीबुट्टी घोटून वा एखादे औषधी मिश्रण तयार करून आपणांस देत नाहीत. जे विद्यार्थी शाळेत जातात तेथील शिक्षक एखादी जडीबुट्टी घोटून वा इतर कोणतेही औषधी मिश्रण तयार करून विद्यार्थ्यांना देत नाहीत. विद्यार्थ्यांमध्ये विद्या–शक्ती अगोदरपासूनच असते. विद्यार्थ्यांच्या अंतरातील सुप्त विद्या–शक्तीस शिक्षक जागृत करतात. जे विद्यार्थी शिक्षकांवर विश्वास ठेवतात, त्यांच्या आदेशाचे पालन करतात, त्या विद्यार्थ्यांवर शिक्षक विशेष लक्ष देतात. पुढे ते विद्यार्थी चांगले शिक्षण लाभल्याने उच्चपदावर नोकऱ्या करीत सुखी जीवन जगत असतात.

याचप्रमाणे संत–महात्मे आपणांस शब्द–नामाशी जोडतात म्हणून त्यांचे आपण उपकार मानतो. कारण ते आपली परमात्म्याशी गाठ घालून देतात, आपल्या आत्म्यावर कृपा करीत त्यास गारवा देतात. ज्यांच्यावर परमात्मा

प्रसन्न असतो, त्यांना तो दाखवून देतो की मी सर्वांत जवळ म्हणजे तुमच्या शरीरामध्येच आहे. त्यांची परमात्मा सतगुरूंशी भेट घडवितात. सतगुरू त्या शिष्यांवर विशेष लक्ष देत त्यांना अंतर्यात नेतात. ज्यांची परमात्मा मिलनाची वेळ आलेली नाही ती लोकं बहीर्मुख बनून कर्मकांडांमध्ये गुंतून पडतात.

***तिन की संगत अहनिस लाहा गुर संगत एह वडाई हे ।।***

संत–महात्म्यांची संगत आपणांस जर लाभली, तर त्यापासून आपणांस फायदाच फायदा होतो. सर्व महात्म्यांनी साधू–संगतीची महिमा गायली आहे की आपण चुकूनही अशी संगत सोडू नये.

महाराज कृपाल सांगत असत, ''शंभर कामे सोडून सत्संगास जावे, हजार कामे सोडून ध्यान–अभ्यासास बसावे. जेवढी आपल्या शरीरास अन्नाची गरज आहे, तेवढीच आपल्या आत्म्यास ध्यान–अभ्यासरूपी अन्नाची गरज आहे. जन्मो–जन्मांतरापासून आत्मा उपवाशी विलाप करीत फिरत आहे. आत्म्याचे अन्न म्हणजे शब्द–नामाची कमाई आहे.'' त्यामुळे आपणांस परमात्म्याच्या प्रिय संतांची संगत जर लाभली, तर आपणांस त्यापासून फायदाच फायदा आहे. कबीर साहेब सांगतात :

***कबीरा संगत साध की जो कीन्ही सो पक्की।***

## जुग जुग संत भले प्रभ तेरे ।। हर गुण गावह् रसन रसेरे ।।

जे समाज असे म्हणतात की, यापुढे कुणी संत वा गुरू–पीर होऊच शकत नाहीत, त्या समाजांची ही विचारधारा चुकीची आहे. जी मुले दोनशे वर्षांपूर्वी वा दोन युगांपूर्वी जन्मास आली त्यांना त्यांच्या पालकांची तसेच आईच्या दुधाची तेवढीच गरज होती, जेवढी गरज वर्तमानात जन्मास येणाऱ्या मुलांना आहे. आपण जर असे म्हणू लागलो की पूर्वी या जगामध्ये संत–महात्म्यांना पाठविण्याची गरज परमात्म्यास वाटत होती, जी गरज आज नाही, तर हे म्हणणे चुकीचे आहे. गुरू नानक साहेब सांगतात :

***जिसका गृह तिस दिया ताला कुंजी गुरू सौंपाई ।***
***अनिक उपाव करे नहीं पाए बिन सतगुरू शरनाई ।।***

ज्या परमात्म्याने या देहाची रचना केली आहे, त्यानेच त्यात कुलूपदेखील लावले आहे. हे कुलूप ना कुणी मनुष्याने ना कुणी गुरूंनी लावले आहे. हे तर परमात्म्याने स्वत: लावले आहे. याची चावी त्याने गुरूमुखांना सुपूर्द केली आहे. स्वत:स प्राप्त करण्याचा मार्ग परमात्मा कोठल्याही प्रकारचा ठेवू शकतो, कारण सर्व जगाचा कर्ता–करविता तोच आहे.

परमात्मा प्राप्तीसाठी आपण मन–बुद्धीचा वापर करून कितीही प्रयत्न केले, तरीही आपण त्यामध्ये यशस्वी होऊ शकणार नाही. त्यासाठी आपणांस सतगुरू चरणी आपले शीर झुकवावे लागेल, सतगुरूंकडून अंतरात जाण्याचा मार्ग प्राप्त करून त्यावर अवलंब करावा लागेल. परमात्मा प्रिय संत–महात्मा या जगात सदैव येत असतात. कबीर साहेब सांगतात :

***अग्नि लगी आकाश को झड़–झड़ पैंण अंगियार।***
***सन्त न होते जगत में तो जल मरता संसार ।।***

परमात्मा प्रिय संत–महात्मा निरनिराळ्या पंथांमध्ये विभागल्या गेलेल्या लोकांना एकत्र करण्याचे कार्य करतात. कोण स्वत:स अमुक धर्माचा समजतो तर कोण स्वत:स अमुक देशाचा नागरिक म्हणवितो. संत आपणांस सांगतात की परमात्म्याने केवळ मनुष्य बनविला. हिंदू, मुस्लीम, शिख, ईसाई आपण नंतर बनलो. त्यामुळे आपण मनुष्य बनणे हे आपले आद्य–कर्तव्य आहे. परमात्म्याने कुणावर कोणतेही लेबल लावून या जगात पाठविले नाही.

आपणा सर्वांचा परमात्मा एक असून, आपण त्याची मुले आहोत. महात्मा आपणांस परमात्म्याच्या प्रेमाचाच संदेश देतात. सत्संगामध्ये सर्व जाती–धर्माची माणसे येऊन बसतात. परमात्मा कुणाचीही वैयक्तिक मालमत्ता नसून जे परमात्म्याची भक्ती करतात, परमात्मा त्यांचा होतो आणि त्यांना तो आपल्या चरणी जागा देतो.

परमात्मा समुद्र असून सतगुरू त्याची लाट आहे तर आत्मा समुद्रातील पाण्याचा थेंब आहे. तो थेंबही पाणी आहे, लाटही पाणी आहे आणि समुद्र स्वत:च पाणी आहे. त्यांमध्ये जो फरक असतो तो दुराव्यामुळे झालेला असतो. ज्या लाटा समुद्रातून निर्माण होतात, त्या अखेरीस पुन्हा समुद्रामध्ये जाऊन लुप्त होतात. याचप्रमाणे संत-सतगुरू परमात्मारूपी सागराच्या लाटा असतात. परमात्म्याने जोपर्यंत आदेश दिलेला असतो, तोपर्यंत ते शब्द-नामाचा प्रचार करत अखेरीस परमात्म्यामध्ये जाऊन पुन्हा एकरूप होतात. आपणांस कल्पना आहे की, आपण जर एखादी गोष्ट लाटेमध्ये टाकली, तर ती गोष्ट लाटेसोबत सागरतळाशी जाते.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जर तुम्ही ध्यान-अभ्यास, नामस्मरण करू शकत नसाल, तर कमीत कमी तुम्ही परमात्म्याच्या प्रियजनांवर प्रेम करावे कारण जेथे आपण प्रेम करतो, तेथे आपली ओढ असते व म्हणून अंतसमयी आपण त्या दिशेलाच जाऊ. वजन काट्याचे जे पारडे जड असते, त्याच बाजूला वजन-काटा झुकतो. अंतसमयी आपले जर जगावर प्रेम असेल तर आपल्या नजरेसमोर जगच येईल आणि जर आपले संतांवर प्रेम असेल, तर आपणांस नेण्यासाठी संत येतील.'' संत नेहमीच या जगामध्ये येत असतात. संतांशिवाय हे जग राहूच शकत नाही. संतांच्या संगतीचा लाभच लाभ मिळतो.

**उसतति करेंह् परहर दुख दालद जिन नाहीं चिंत पराई हे ।।**
**ओय जगत रहैं न सूते दीसेंह् ।। संगत कुल तारे साच परीसेंह् ।।**

संत-महात्मा जगाच्या दिशेने निद्रावस्थेत तर परमात्म्याच्या दिशेने जागृत अवस्थेत असतात. ते आपल्या अंतरातही ध्यान-अभ्यासाची कमाई करून परमात्म्याच्या दिशेने जागृत होण्याची व जगाच्या दिशेने निद्रावस्थेत राहण्याची भावना निर्माण करतात. सर्वांप्रती प्रचंड आपुलकी घेऊन ते या जगामध्ये येतात. जे संत आपणांस नाम देतात त्यांच्या अंतरात आपल्याप्रती

खरी आपुलकी आणि खरे प्रेम असते. आपण जेव्हा परमात्म्याची भक्ती करीत आपले इतरत्र पसरलेले लक्ष नामस्मरणाच्या मदतीने दोन्ही नेत्रांच्या मागे म्हणजे तिसऱ्या तिळावर एकाग्र करतो, तेथेच आपल्या खऱ्या घराचा दरवाजा आहे. येथून आपल्या अध्यात्मिक प्रवासाची सुरूवात होते. आपण जेव्हा त्या दारावर पोहोचतो, तेव्हा आपण जगाच्या दिशेने निद्रावस्थेत आणि परमात्म्याच्या दिशेने जागृत अवस्थेमध्ये येऊ लागतो.

जे लोक परमात्म्याची भक्ती करू लागतात, त्यांची या जगातील लोकं निंदा करू लागतात, त्यांना त्रास देऊ लागतात. आई-वडील, पत्नी सगळे टोमणे मारतात, तू आता भक्ती करू लागला आहेस! जर एखादी स्त्री भक्ती करीत असेल तर पती तिला टोमणा मारू लागतो की तू भक्ती करू लागली आहेस! तुला मुला-बाळांची चिंता नाही. परंतु हे तिच्या हातात राहिलेले नसते. एखादा जर कोणी भक्तीमार्गावर जाऊन स्वगृही जाण्याप्रती जागृत झाल्यास, त्यास कुणी कितीही समजावले तरीही तो जागृतच राहतो. अशावेळी ते स्वत: तरून जातात, संगतलाही तारतात.

महाराजच सावन सिंहजी सांगत असत, ''सत्संगीची अनेक कुळे तरतात. गुरूमुखांची शंभर कुळे तरतात. गुरूमुख संगतच्या अनेक कुळांना तारतात. हा सर्व नामाच्या कमाईचा प्रताप आहे.''

**कलमल मैल नाहीं ते निरमल ओर रहैं भगत लिव लाई हे ।।**

परमात्म्याचे प्रेमीजन निर्मळ आणि पवित्र असतात. ते या जगामध्ये राहूनही या जगातील घाणीमध्ये फसत नाहीत. त्यांचे रक्त अतिशय पवित्र असते. एखाद्या कोडाने आजारी असलेल्या मनुष्यास जर त्यांनी स्पर्श केला तर त्या कोड्याचा रोग नाहीसा होतो. एखाद्या पवित्र वस्तूचा तर आपण कुणाला स्पर्श करविला, तर तो मनुष्य कायमस्वरूपी बरा होतो. माझा स्वानुभव आहे की जे लोक अनेक आजारांनी ग्रस्त असतात, ते लोक जर

पवित्र आत्म्याच्या संपर्कामध्ये आले, तर ते बरे होतात. हा काही चमत्कार नसतो. संत या जगातून निघून गेल्यावर येथील लोकं महात्म्यांचे मोठेपण वर्णन करताना अशा अनावश्यक गोष्टी लिहितात.

आपण प्रेमाने सांगता की, परमात्म्याचे प्रेमीजन निर्मल आणि पवित्र असतात. आपल्या अंतरामध्ये शब्द–नामाची कमाई करण्याची आवड निर्माण करून, ते आपणांसही पवित्र बनवितात. जोपर्यंत आपण विषय–विकारांमध्ये अडकून पडलेलो असतो, तोपर्यंत आपण कधीच पवित्र होऊ शकत नाही. मग त्यासाठी आपण कितीही तिर्थस्थानांवर जाऊन स्नान केले, मूर्तीपुजा केली, तरीही त्याचा काहीच उपयोग होत नाही. गुरु नानकदेवजी सांगतात :

***जन्म जन्म की इस मन को मल लगी काला होया सुआओ ।***
***धोती खनली न उज्जल होय चाहे सौ धोवन पाओ ।।***

आपल्या मनावर जन्मो–जन्मांतरीच्या मळांचे थर लागले असल्याने, शरीरास कितीही धुतले तरी त्याचा काहीच उपयोग होत नाही. बियांपासून तेल काढण्यासाठी ज्या घाणीचा वापर केला जातो, तिच्यामध्ये एक कपडा असतो, ज्यास खनली म्हटले जाते. त्या कपड्यामध्ये सतत तेल झिरपत राहत असल्याने, त्यास कितीही साबण वापरून धुण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचा काही उपयोग होत नाही. अशीच अवस्था आपल्या मनाची आहे. आत्म्याची सफाई करण्यासाठी संत–सतगुरु धोबी बनून या जगात येतात. त्यांना कल्पना असते की, पापांच्या थराखाली शुद्ध आत्मा दबलेला आहे. मी एखाद्या कपड्यास धुवून स्वच्छ करू शकतो असा स्वकर्तुत्वावर विश्वास जसा धोब्यास असतो, तसाच विश्वास संतांना आपल्या नाम–शब्दावर असतो की, आपण एखाद्या मनुष्याच्या अंतरामध्ये नाम–शब्द ठेवला, तर त्याचा आत्मा स्वच्छ होऊन तो भक्तीमार्गास लागेल.

**बूझो हर जन सतगुरू बाणी ।। एह जोबन साँस है देह पुराणी ।।**

मुसलमान त्या शक्तीस कलमा किंवा बाँगे असमानी संबोधतात. कुणी महात्मा तिला दिव्य धुनी तर कुणी तिला अंतरातील स्वर असे म्हणतात. गुरु नानकदेवजी त्या शक्तीला रब्बी बाणी वा धुर की बाणी म्हणून संबोधतात. गुरु नानकदेवजी सांगतात की, परमात्म्याने आपणां सर्वांच्या अंतरामध्ये प्रकाश ज्योत ठेवलेली आहे. ती वाणी रात्रं-दिवस अंतर्यात गुंजत आहे :

***धुर की बाणी आई जिन सगली चिन्त मिटाई ।***

ही वाणी परमात्म्याच्या दरबारातून, सच्चखंडात निर्माण होत असून आपल्या माथ्याच्या मागील बाजूस गुंजत आहे. येथे जात-धर्माचा प्रश्न नसतो. तो भाग्यशाली जीव आपले या शरीराच्या नऊ द्वारांमध्ये विखुरलेले लक्ष नेत्रांच्या मागील बाजूस एकाग्र करील, तो या वाणीसोबत जोडला जाईल. त्यास विश्वास असतो की गुरुंनी सांगितलेली वाणी खरी आहे व इतर सर्व वाण्या त्या वाणीचा महीमा वर्णन करतात, त्या वाणीशी एकरूप होण्याचे फायदे सांगतात.

एकदा आम्हा सैनिकांची पलटण डेरा ब्यास जवळ काही काळासाठी मुक्कामी होती. आम्ही अखंड-पाठ करण्यासाठी महाराज सावन सिंहजींना आमंत्रित केले. महाराज सावन सिंहजींनी आम्हांस फार थोड्या शब्दांत समजावले परंतु त्याने आमच्यापैकी अनेकांच्या जीवनाची कायापालट झाली, कारण आम्हांस केवळ वाणीचे पठण करणे एवढेच माहित होते, परंतु त्या वाणीचा अर्थ आम्हांस समजत नव्हता. महाराजजींनी सांगितले, ''हे पहा बंधुनो! मी आपणांस प्रेमाने सांगतो की ही वाणी दुसऱ्या एका वाणीचा उल्लेख करीत आहे जी आपल्या सर्वांच्या अंतरात सामावलेली आहे.''

***पुरे गुरू की बानी सब माहे समानी, आप सुणी ते आप बखानी ।***

संत-सतगुरू स्वत: ती वाणी श्रवण करतात, तसेच आपणा सर्वांना ती वाणी श्रवण करण्याचा उपदेश देतात. या वाणीची चावी संत-महात्म्यांच्या ताब्यात ठेवलेली आहे. आपला देह क्षण-भंगूर आहे. कधी परमात्म्याचे

बोलावणे येईल वा आजाराने ते ग्रस्त होऊन निकामी होईल वा मृत्यु याचा नाश करेल! याची आपणांस कल्पना नाही. त्यामुळे आपले कर्तव्य आहे की सचखंडामधून येत असलेल्या वाणीचा अर्थ समजून घेऊन तिच्या सहाय्याने आपल्या खऱ्या घरी वाटचाल करावी.

**आज काल मर जाईऐ प्राणी हर जप जप रिदै ध्याई हे ।।**
**छोड़ो प्राणी कूड़ कबाड़ा ।। कूड़ मारे काल उछाहाड़ा ।।**

आता आपण सांगत आहात की, तुम्ही दुष्कृत्ये करणे सोडून द्या. आपण काळाच्या राज्यामध्ये राहत असून, तो आपणांस माफ करणार नाही. चोर–लुटारूंना पोलीस माफ करतील असा जर विचार हृदयामध्ये येत असेल, तर तो सोडून द्या. कारण असे कधीच होऊ शकत नाही. चोर जोपर्यंत पोलिसांपासून दूर असतो, तोपर्यंत तो स्वत:स माफी मिळाली आहे असे मानतो. परंतु तो जाणार कोठे? वेळ आल्यावर तो पोलिसांच्या तावडीत नक्कीच सापडतो. आपलीही अवस्था अशीच आहे. आपण जगात दुष्कृत्ये व हत्या करतो. परंतु काळ आपणांस माफ करीत नाही, तो आपणांस शिक्षा नक्कीच देतो. कबीर साहेब सांगतात:

***किए पाप रखे तले दबाऐ प्रगट भए नादान जब पूछे धर्मराय ।***

आपण म्हणतो की, आपण करीत असलेल्या कर्मांची इतरांना काय कल्पना? त्यामुळे आपण काहीही आपल्या मर्जीनुसार करण्यास काय हरकत आहे? महात्मा आपणांस सांगतात की, आपण जगाच्या नजरेपासून लपू शकतो, कदाचित स्वत:च्या नजरेपासूनही लपू शकतो, परंतु जो आपल्या अंतरात बसलेला आहे त्यास कुणाच्या साक्षीची गरज नसते, कारण तो स्वत: सर्वकाही पाहत असतो. तो आपल्या श्वासा श्वासाचा हिशोब ठेवत असतो. आपण जर दुष्कर्मे केली, तर काळ आपणांस माफ करणार नाही. तो आपणांस नरकामध्ये ढकलून देईल.

## साकत कूड़ पचेंह् मन हौमैं दुह मारग पचै पचाई हे ।।

जे परमात्म्याची भक्ती करीत नाहीत, त्यांना साकत असे संबोधले गेले आहे. त्यांचे हृदय घोंगडीप्रमाणे काळे असते. कबीर साहेब सांगतात, काळे घोंगडे साबण वापरून धुण्याचा कितीही प्रयत्न केला तरीही ते सफेद होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे साकत पुरुषामध्ये अहंकार ओतप्रोत भरलेला असतो. त्याला वाटते की, माझ्या सारखा दुसरा कोण आहे? तो स्वत:च्या मृत्युस आणि जन्मदात्यास विसरून जातो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जप–तप केल्यावर, जे लोक त्याबद्दल अहंकार करतात, त्यांचे असे करणे म्हणजे स्वादिष्ट पुलाव तयार केल्यावर त्यावर राख शिंपडण्यासारखे असते.'' कबीर साहेब आणि गुरू नानकदेवजी देखील हेच सांगतात :

***तीर्थ व्रत और दान कर मन में धरे गुमान ।***
***नानक नेह फल जात है ज्यों कुंचर स्नान ।।***

आपण चुकून जरी दहा रुपयांचे दान दिले, तरी त्याची वर्तमानपत्रात जाहिरात देतो. ब्राह्मणांकरवी सर्व लोकांसमोर प्रार्थनारूपात जाहिर करवितो की मी एवढे दान दिले आहे, मी एवढे तांदूळ लोकांना अन्नदान म्हणून दिले आहेत. मग आपणांस असे वाटू लागते की मी किती मोठा दानशूर आहे, परंतु विचार करून पाहा! त्या दानाच्या रक्कमेपैकी तुम्ही स्वकष्टाने कमावलेले धन किती आहे? बुल्लेशाह सांगतात :

***आरन दियां चोरियां सूई करदे दान ।***
***कोठे चढ़कर देखदे औंदा कदों बवान ।।***

दान करीत असलेल्या पैशांबद्दल आपणांस कल्पनाही नसते की कुणाची फसवणूक करून ते आपल्याकडे आले आहेत? ते चोरीचे आहेत की बेईमानी करून कमावले आहेत? मृत्युसमयी आपण विचार करू लागतो,

सतगुरु आपणांस नेण्यासाठी आले आहेत का? सतगुरुंनी तुमच्याकडून काही कर्ज घेतलेले नाही की, त्यांनी तुम्हांस नेण्यासाठी यायलाच हवे. सतगुरु आयुष्यभर आपणांस सांगत असतात की, पवित्र बना, मेहनतीने आणि स्वकष्टाने रोजगार कमवा. तसे केलेत तर परमात्मा कृपा करून त्यात समृद्धी बहाल करेल.

आपण प्रेमाने समजावत आहात की दोन होडींवर पाय ठेवणाऱ्यास नेहमी दु:ख व कष्ट सहन करावी लागतात. कारण एके बाजूस तो दुष्कृत्ये करीत असतो आणि दुसऱ्या बाजूने सत्कृत्ये. अशावेळी परमात्मा त्याच्या दान-पुण्याकडे पाहील की त्याने वाम-मार्गाने कमावलेल्या रोजगाराकडे पाहील? गुरु नानकसाहेब सांगत आहेत :

***दे दे मंगे सहसा गुणा शोभ करे संसार ।***

एक रुपया दान देऊन आपण हजार रुपये मागतो, शिवाय अशी देखील अपेक्षा करतो की जगाने आपली वाहवा करावी की हा खूप मोठा दानशूर आहे. संत-महात्मा दान-पुण्य करणे वाईट असते असे म्हणत नाहीत. दान करून आपल्या कमाईचा सदुपयोग करणे आवश्यक आहे. स्वकष्टार्जित रक्कमेतून दान नक्कीच करावे. स्वकष्टाने पैसे कमावून स्वत:चा उदरनिर्वाह करणे देखील गरजेचे आहे.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''उजव्या हाताने केलेल्या दानाबद्दल डाव्या हातालाही माहीत नसावे.''

## छोड़ो निंदा तात पराई ।। पढ़ पढ़ दझेंह् सांत न आई ।।

आता गुरुसाहेब सांगत आहेत की, आपण कुणाची निंदा करू नये, त्यामुळे आपलेच नुकसान होत असते. ज्याची निंदा आपण करतो, त्याचे अवगुण आपल्या खात्यात जमा होतात आणि आपले चांगले गुण त्याच्या खात्यात जमा होतात.

महाराज सावन सिंहजी सांगत,''निंदक स्वत:स तुच्छ बनविण्याचे काम करीत असतो. आपण चुकूनही कुणाची निंदा करू नये. आपण आपल्या मनाची निंदा करावी. कारण आपले वैरी मन आपणांस आपल्या सतगुरुंची भेट होऊ देत नाही, भक्ती करू देत नाही.''

आपण कुणाची ईर्ष्या करू नये. कारण ज्याच्या अंतरामध्ये ईर्ष्या, द्वेष वा अहंकार असतो, तो परमात्म्यापासून खूप दूरावतो. परमेश्वराचे प्रियजन एका ठिकाणी बसून भक्ती करतात. अधिक वाचल्याने आपणांस वाद-विवाद करण्याची सवय जडते. त्यामुळे जे काही आपण वाचतो, त्याचा अगोदरच विचार करून ते वाचतो.

***पढ़या शांत न आवई पूछो ज्ञानियां जाई ।***

परमात्म्याची भक्ती, परमात्मा प्राप्ती आपल्या मन-बुद्धीद्वारे होऊ शकत नाही, कारण हे दोन्ही अज्ञानी आहेत. जेथे मन-बुद्धी कुंठीत होते, तेथूनच परमात्म्याच्या भक्तीची सुरुवात होते. तुम्ही एखाद्या विद्वानास विचारून पहा की, तुम्हांला परमात्मा भेटला का? तुम्हांस शांती लाभली का?

***पढ़या ईलम अमल न कीता पढ़या फेर पढ़ाया की।***
***आदत खोटी न गँवाई मत्था फेर घिसाया की ।।***

आपण जे काही वाचतो, शिकवितो त्याचा अर्थ आपणांस समजला नसेल, तर त्या वाचण्या-शिकण्याचा काय उपयोग? कारण आपण इतके वाचून-शिकवूनही आपल्या कोणत्याही वाईट सवयीचा त्याग करीत नाही.

महात्मा प्रेमाने सांगतात की, आपण वाणी प्रेमाने व सद्‍भावनेने वाचली तर आपल्या लक्षात येईल की महात्म्यांनी ग्रंथांमध्ये किती सुंदर उपदेश केला आहे की, मद्यपान करू नये, कुणाची निंदा करणे वाईट आहे. यानुसार जर आपण वागू लागलो तर जगामध्ये एकही जात-धर्मभेद उरणार नाही. आपण सर्वजण परमात्म्याची मुले आहोत, सर्वच जण त्याची भक्ती करतील.

**मिल सत संगत नाम सलाहो आतम राम सखाई हे ।।**
**छोडो काम क्रोध बुरयाई ।। हौमैं धंध छोडो लंपटाई ।।**

आपण सांगत आहात, स्वगृही पोहोचल्यावरच आत्म्यास शांती प्राप्त होईल. इतरांची निंदा करणे सोडून द्या. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे आपले कट्टर शत्रू असून, त्यांचा आपण त्याग केला तर आपोआपच आपणांस शांती लाभेल. परंतु आपण तर त्यांना आपले मित्र बनवून बसलो आहोत. त्यांना आपल्या घरामध्ये स्थान दिल्यावर आपणांस शांती कशी मिळेल? आपल्या अंतरामध्ये कामवेग निर्माण होतो, तेव्हा आपल्या शेजारी उभा असलेला मनुष्यही आपणांस दिसत नाही, मन आपल्याद्वारे जनावरांसारखी कृत्ये करवून घेते. अशीच अवस्था क्रोधाची आहे. क्रोधाच्या आवेगात एक भाऊ दुसऱ्या भावाचे शीर, गाजर-मुळा कापावे तसे कापतो. एक धर्म दुसऱ्या धर्माचा नाश करण्याचा प्रयत्न करतो. हे खरे तर काही क्षणांसाठी आलेले वेडेपण असते. काय क्रोधीस कधी शांती लाभते का?

कबीर साहेब सांगतात, ''कामी, क्रोध, लालची मनुष्य कधी भक्ती करू शकत नाही. कामामुळे आत्मा तिसऱ्या तिळावरून खाली उतरते आणि क्रोधामुळे त्याचा फैलाव होतो. क्रोधीचे रक्त जळून जाते. तुम्हांस शांती प्राप्त करून घ्यायची असेल, तुम्ही परमात्म्यास प्राप्त करू इच्छित असाल तर काम आणि क्रोधाचा त्याग करा.''

**सतगुरू सरण परो ता उबरो इयों तरीऐ भवजल भाई है ।।**

आपण सांगत आहात की काम, क्रोध, सोडून तुम्ही सतगुरुंना शरण जा. त्यानंतरच तुम्ही भवसागर पार कराल आणि तुम्हांस शांती लाभेल. केवळ सतगुरु शरणी जाऊनच शांती प्राप्त होईल.

मी नेहमी सांगतो की, आपण सर्वजण आपापल्या पद्धतीने गुरुमतानुसार जगण्याचा प्रयत्न करीत असतो. पण खऱ्या गुरुमताची सुरुवात कोठून

होते? आपल्या आत्म्यावर प्रथम स्थुल, त्यानंतर सुक्ष्म आणि त्यावर कारण पडद्याचे आवरण आहे. हे तिन्ही पडदे दूर सारून आपण जेव्हा दहाव्या द्वारी पोहोचतो, तेव्हा तेथूनच गुरुमताची प्राथमिक सुरुवात होते. आपण चौथ्या अवस्थेमध्ये पोहोचतो, तेव्हा दहाव्या द्वाराच्या वाटेवर एक खूप गोंधळात टाकणारा अंध:कारमय देश येतो ज्यास तिमिर खंड असे म्हटले जाते. कबीर साहेब सांगतात:

***महासिंध बिखमी घाटी, बिन सतगुरू पावे नही वाटी ।।***

हिंदु–शास्त्रात लिहिले आहे की, अंधारात तेज निर्माण करणारे गुरू असतात. आत्मा अंध:कारमय महाशून्य प्रदेशात अडखळत धडपडत असतो. तेथून परिपूर्ण गुरूच स्वयंप्रकाशाच्या मदतीने आत्म्यास पुढे घेऊन जाऊ शकतात. तेथे गेल्यावरच परिपूर्ण गुरु व अपूर्ण गुरूंची पारख होते. आपण गुरुमतानुसार वाटचाल करीत आहोत की, त्यापासून आपण हजारो मैल दूर आहोत याची कल्पना आपणांस येते. सतगुरुंना शरण गेल्यानंतरच तुमचा उद्धार होईल. म्हणून सतगुरु जे काही सांगतात, त्यानुसार तुम्ही वागा.

**आगै बिमल नदी अगन बिख झेला।। तित्थै अवर न कोई जीउ इकेला।।**

आपले शरीर आपण येथेच सोडून जाणार आहोत. ज्यांना आपण बंधु–भगिनी बनवून बसलो आहोत, ते अंतसमयी आपणांस कसलीच मदत करू शकत नाहीत. एकतर ते आपली संगत सोडतील वा आपण त्यांना सोडून जाऊ. पुढे ज्या नदीचा उल्लेख केला आहे, तिचा हिंदु–शास्त्रांमध्येही उल्लेख येतो, तिला अग्नी–नदी असे म्हणतात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''काळाने आतमध्ये असे अनेक तप्त खांब ठेवले आहेत, ज्या खांबांपैकी एक खांब जरी या जगात आला, तरी हे जग जळून खाक होईल. ज्यांचे चरित्र चांगले नसते, अशा मलिन आत्म्यांना या खांबांना चिटकविले जाते. ती अग्नी–नदी सर्वांनाच पार करून

जावे लागते. परंतु सतगुरु लाभले असतील, तर सत्संगीचा मार्गच निराळा असतो. सतगुरु आपल्या शिष्यास त्या मार्गाने कधीच पाठवित नाहीत.''

**भड़ भड़ अगन सागर दे लहरी पड़ दझेंह् मनमुखताई हे ।।**

संत–महात्मे जेव्हा वाणी लिहितात तेव्हा त्यांचा कुणाचे हृदय दुखविण्याचा हेतू नसतो, ना ते कुणाची निंदा करतात. परंतु सत्य विदीत करणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे समुद्रात रात्रंदिवस लाटा निर्माण होत असतात, त्याचप्रमाणे त्या नदीमध्ये सतत अग्नीच्या लाटा निर्माण होत असतात. तेथे गेल्यावर आपणांस समजते की, आपण वाचन–पठण केल्याने पार होतो की, सतगुरु आपणांस पार करवितात. एखादे परिपूर्ण सतगुरुच आपणांस त्या लाटांपासून बचाव करीत पार नेऊ शकतात नाहीतर आपण स्वत:हून जाणे तर अशक्यच आहे. तेथे आपल्या लक्षात येते की पूर्ण सतगुरु कोण आहेत?

मी सांगत असतो की, कोणत्याही संतांना शरण जाण्यापूर्वी त्यांचे जीवन चरित्र वाचून पाहा! त्यांनी १०–२० वर्षे परमात्म्याची भक्ती केली आहे का? त्यागी जीवन व्यतीत केले आहे काय? ज्यांनी स्वत: त्याग केलेला असतो, तेच इतरांद्वारे त्याग करवू शकतात, इतरांना उपदेश देऊ शकतात. परंतु आपली अवस्था अशी आहे :

***अवरो को उपदेश दे मुख में पड़हे रेत ।***
***रास बिरानी राग ते खाया घर का खेत ।।***

आपण स्वत: तर ध्यान–अभ्यास केलेला नसतो, ना कसला त्याग केलेला असतो, ना आपली सुरत देह सोडून कधी ब्रह्मांडात गेलेली असते, परंतु लोकांना मात्र नामाची दिक्षा देऊन नाम–कमाई करण्याचा उपदेश करीत असतो. आपणांस कल्पना आहे की सतगुरु अंतरात बसलेले असून, त्यांची कुणी फसवणूक करू शकत नाही.

***राम झरोखे बैठकर सबका झारा ले । जांकी जैसी चाकरी ताँको तैसा दे ।।***

वंश–परंपरेने बनणारे गुरू हे काम करू शकत नाहीत. कुणी नामाची कमाई केलेले महात्माच आपणांस अंतर्यात पुढे नेऊ शकतात.

**गुर पह मुकत दान दे भाणै ।। जिन पाया सोई बिध जाणै ।।**

परमात्म्याने मुक्ती संतांच्या हातामध्ये ठेवली आहे. ते त्यांच्या ईच्छेनुसार शब्दनामाचे दान देऊ शकतात. कारण या शब्दनामाचे त्यांनी मूल्य ठेवलेले नसते. ज्याप्रमाणे परमात्मा प्रकाश, जल, हवा सर्वांना मोफत देतो, त्याचप्रमाणे महात्मा या जगामध्ये त्यांची दया मोफतच वाटतात. मुक्तीचा मार्ग संतांच्या हातामध्ये आहे. त्यांच्या अंतरामध्ये सर्वांप्रती दया असते.

महाराज कृपाल सांगत असत,''प्रश्न असतो तो घेणाऱ्याचा, कारण संत सच्चखंडातून देण्यासाठीच आलेले असतात. परमात्मा दान देताना कधीच थकत नाही, आपण मात्र घेता–घेता थकून जातो.''

**जिन पाया तिन पूछो भाई सुख सतगुरू सेव कमाई हे ।**

ज्यांनी सतगुरुंची सेवा केली, ध्यान–अभ्यास केला, त्यांच्या आदेशाचे पालन केले, त्यांना जाऊन तुम्ही विचारा की, सतगुरुंची सेवा कशी केली जाते? सतगुरुंचा सेवक जिवंतपणीच मरतो आणि मृत झाल्यानंतर पुन्हा जिवीत होतो, कारण तो शब्दामध्येच जगतो आणि शब्दामध्येच मृत पावतो.

अखेरीस गुरु नानकदेवजी महाराज सांगतात की, कोणीही परमात्म्यास गोष्टी (कथन) करून प्राप्त करून घेतलेले नसते. हे जर केवळ गप्पा–गोष्टींचे (कथनीचे) काम असते तर अद्यापि आपण सर्वांनी गप्पा मारून परमात्म्यास प्राप्त करून घेतले असते.

***

# ध्यान-अभ्यासा विषयी प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे,
संतबाणी आश्रम, १६ पी एस राजस्थान

**एक प्रेमी :** संतजी, मी जेव्हा ध्यानाला बसताना डोळे बंद करतो तेव्हा माझे ध्यान दोन्ही डोळ्यांच्या मध्यभागी जाते परंतु माझी नजर कोणत्या दिशेस पहात आहे याची जाणीव असल्याने मला वाटते की मी खालच्या बाजूस पहात आहे त्यामुळे मला माझे ध्यान एकाग्र करणे कठीण जाते. कृपया तुम्ही मला सांगा की कशाप्रकारे मी आपले ध्यान वरच्या बाजूला नेऊ शकतो?

**बाबाजी :** मी नेहमी प्रेमींना हा सल्ला देतो की आपण संतबाणी मासिक लक्षपूर्वक वाचत जा. त्यात अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आहेत. आपण मासिक लक्षपूर्वक वाचले तर आपणांस त्यात अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरे सापडतील.

मी नेहमी सांगत असतो की जेव्हा आपण ध्यानाला बसतो तेव्हा आपले शरीर, मन, सुरत (ऐकण्याची शक्ती) आणि निरत (पाहण्याची शक्ती) स्थिर असली पाहिजे. जर आपले शरीर स्थिर असेल तर ते मनाला स्थिर करण्यास मदत करेल. जेव्हा आपले मन आणि शरीर स्थिर असतील तेव्हा ते आपली सुरत आणि निरत स्थिर करण्यास मदत करतील.

सुरत ऐकण्याचे तर निरत बघण्याचे काम करते. जेव्हा आपण ध्यानाला बसतो तेव्हा आपले शरीर, मन, सुरत व निरतला स्थिर केले पाहिजे. या बाबतीत मी उदाहरण देत असे की आम्हाला आर्मीमध्ये शिकवले जात असे की बंदूक कशाप्रकारे चालवली जाते? आपल्याला गोळी अचूक निशाण्यावर मारण्यासाठी शरीर, बंदूक आणि निशाणा एका लाईनीत ठेवणे गरजेचे असते. जर या तीनही गोष्टी एका लाईनीत नसतील किंवा हलत असतील तर आपला नेम अचूक लागू शकत नाही. संतमतात सुद्धा हा सिद्धांत लागू

होतो. जर आपण योग्य पद्धतीने अभ्यास करू इच्छित असाल तर आपले शरीर व मन शांत असणे गरजेचे आहे. आपले ध्यान दोन्ही डोळ्यांच्या मध्यभागाच्या थोडेसे वर (तिसऱ्या तिळावर) असले पाहिजे. आपण बाह्यजगात पाहण्या ऐवजी अंतर्यात पाहिले पाहिजे.

नामदानाच्यावेळी प्रेमींना सांगितले जाते की जेव्हा आपण ध्यान–अभ्यासात बसता तेव्हा कोणत्याही प्रतिमेचे स्मरण करण्याची गरज नसते. आपण फक्त डोळे बंद करा, डोळे बंद करुन आपण जे काही अंतर्यात पहात असता ते आपल्या तिसऱ्या नेत्रानेच पहात असता. आपणांस तिसरा डोळा शोधण्याची गरज नसते. जेव्हा आपण बाह्यजग पहाणारे डोळे बंद करता तेव्हा तिसरा डोळा कार्यरत होतो.

मी प्रेमींना नेहमी सल्ला देतो की तुम्ही जेव्हा ध्यान–अभ्यासात बसता, तेव्हा तुम्ही कोणतीही वस्तू बघण्याचा प्रयत्न करू नये. आपणास फक्त तिसऱ्या तिळावर लक्ष ठेवले पाहिजे आणि पंच–शब्दांचे नामस्मरण केले पाहिजे. प्रेमींना हे माहित नसते की आपण ध्यान नेमके कुठे एकाग्र करावे. ते कधी वर, कधी खाली, कधी डाव्या तर कधी उजव्या बाजूला पाहू लागतात कारण त्यांनी आपले लक्ष एकाग्र केलेले नसते. त्यांचे लक्ष विखुरलेले असते. ते पूर्ण वेळ आपले ध्यान एकाग्र करण्यासाठीच संघर्ष करीत राहातात.

**एक प्रेमी :** संतजी, मनाला वश करण्यासाठी नामस्मरण करणे गरजेचे असते परंतु आपणास नामाचे स्मरण करण्यासाठी मनावरच निर्भर राहावे लागते. हे म्हणजे धान्याच्या रखवालीसाठी कावळ्याला बसवण्याप्रमाणे आहे?

**बाबाजी :** नामदानाच्यावेळी आपणांस सांगितले जाते की, जेव्हा सेवकाला नामदान दिले जाते तेव्हा गुरू सेवकाच्या अंतर्यात शब्द–रूप होऊन बसतात. जेव्हा आपण नामस्मरण करता तेव्हा आपण गुरूंची मदत घ्या. आपणांस नामस्मरणासाठी मनाऐवजी गुरूंची मदत घेण्याची इच्छा बाळगली पाहिजे.



**एक प्रेमी :** संतजी, कृपया आपण आम्हास एखादी गोष्ट सांगा.

**बाबाजी :** आपण जेव्हा ध्यान–अभ्यासाच्या गोष्टी करता, तेव्हा आपणांस ध्यान–अभ्यासा संदर्भात सांगितलेल्या गोष्टी आवडतात. जर एखादा प्रश्नच तसा असेल तर आपोआपच त्या संदर्भातील गोष्ट सुचते व ती त्यासंदर्भातच सांगितलेली चांगली वाटते. संदर्भ नसताना अशीच सांगितली गोष्ट श्रोत्यांना आवडत नाही.

**एक प्रेमी :** संतजी, मी अंतर्यात अनेक प्रकारची धून तसेच निरनिराळे आवाज ऐकतो. ते आवाज कधी मोठे तर कधी मृदू वा सौम्य असतात. मला कळत नाही की मी मोठ्या आवाजांवर ध्यान एकाग्र करू की मृदू आवाजांवर ध्यान केंद्रीत करू? काय निरनिराळ्या मोठ्या आवाजात काही अंतर असते की मी आवाज ऐकूनच संतृप्त झाले पाहिजे?

**बाबाजी :** यासाठीच मी नेहमी प्रेमींना संतबाणी मासिक वाचण्यासाठी सांगतो, कारण अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे मासिकात पूर्वी छापली गेलेली आहेत. मी नेहमी सांगतो की पाणी जेव्हा डोंगरावरून खाली वाहत येते तेव्हा त्या पाण्याचा आवाज एक प्रकारचा असतो तेच पाणी जेव्हा दगडांवरून वाहत असते तेव्हा त्याचा आवाज दुसऱ्या प्रकारचा असतो, तेच पाणी जेव्हा रेतीवरून वाहत असते तेव्हा त्याचा वेगळ्या प्रकारचा आवाज येतो. शेवटी ते पाणी जेव्हा समुद्रात जाऊन पडते तेव्हा त्याचा आवाज वेगळा असतो. पाणी तेच असते पण आवाज बदलत जातो कारण पाणी वेगवेगळ्या स्थानां मधून वाहत गेले. सच्चखंडातून आवाज एकच येतो. पण हा आवाज पाच वेगवेगळ्या स्थानांमधून पुढे येतो.

संतांनी यांस पाच वेगळ्या पद्धतीचे शब्द म्हणून संबोधले आहे. पाच स्थानांमधून गेल्यामुळे आपणांस पाच वेगवेगळ्या तऱ्हेचे आवाज ऐकू येतात. आपणांस सुरूवातीला जो आवाज ऐकू येईल त्या आवाजास पकडा व

त्यावर ध्यान केंद्रीत करा, मग तो उंच जागेतून आलेला मोठा आवाज असो वा सखल जागेतून आलेला मृदू आवाज असो. आपण एकच धुन पकडावी. आपण जी धुन ऐकता ती धुन सच्चखंडातून येत असते.

हे प्रेमींचे सर्वसामान्य प्रश्न आहेत ज्यांचे उत्तर पूर्वी अनेकदा दिले गेले आहे व संतबाणी मासिकात छापले गेले आहे. म्हणून संतबाणी मासिक आपण नियमीत वाचले पाहिजे. जर आपण पूर्वीचे अंक वाचले नसले तर ते वाचावेत. मला आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात काहीही त्रास नाही. मी असे ही सांगत नाही की मला कोणीही प्रश्न विचारू नका. जर आपण पुन्हा पुन्हा तेच-तेच प्रश्न विचारले तर मी म्हणतो की आपण संतबाणी मासिक पत्रिका व इतर संतमत विषयक पुस्तके वाचा ज्यामुळे आपला फायदाच होईल.

**एक प्रेमी :** संतजी, जेव्हा मी आजारी पडतो तेव्हा मला असे वाटते की अशा वेळी माझे मन मला ध्यान-अभ्यासापासून दूर नेते. जेव्हा असे घडत असते तेव्हा मनावर ताबा मिळविण्याचा काय उपाय आहे?

**बाबाजी :** सुखं-दु:खं, गरीबी-श्रीमंती, आजारपण-सदृढ आरोग्य हे सर्व आपणांस स्वत:च्या पूर्वकर्मांनुसार मिळते. आपले मन नहेमीच काहीना काही कारणे शोधत असते जेणेकरून आपण ध्यान-अभ्यास करू नये. जर आपले सतगुरूंशी खरे प्रेम असले व आपण सतगुरूंना आपले सर्वस्व समर्पित केलेले असले तर मग आपण कितीही आजारी जरी झालो तरी आपण ध्यान-अभ्यास सोडणार नाही. जर आपल्या अंतरात सतगुरूंवर पूर्ण विश्वास नसला तर किरकोळ आजारपणात सुद्धा आपले मन म्हणते की मी खूप आजारी आहे आणि आपण ध्यान-अभ्यास करणे सोडून देतो.

***

# धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
मुंबई तसेच संत–बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती

## मुंबई शहरातील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रिय साधुसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजजींच्या अपार कृपेने यंदा मुंबई शहरात सत्संगाचा कार्यक्रम **बुधवार दि. ४ जानेवारी २०१७ पासून रविवार दि. ८ जानेवारी २०१७** पर्यंत खालील पत्त्यावर होईल. सर्व गुरूप्रेमी बंधु–भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की बाबाजींच्या मधुर आठवणीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ३ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी किंवा ४ जानेवारी २०१७ रोजी सकाळी खालील पत्यावर पोहोचून नामस्मरणाचा तसेच संत वचनांचा लाभ घ्यावा. परमपुज्य संत अजायब सिंह महाराजजींचा **भंडारा ८ जानेवारी २०१७** रोजी साजरा केला जाईल.

**भूराभाई आरोग्य भवन,**
**शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमाजवळ,**
**कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७**
**फोन नं.: ०९३२४६७०३०१, ०९८३३००४०००, ०२२–२४९६५०००**

## सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

**२५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०१६**
**२३ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०१६**
**०२ फेब्रुवारी ते ०६ फेब्रुवारी २०१७**